**कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.**

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १५.०४.२०१७ रोजी संपन्न झालेल्या विशेष बैठकीचे इतिवृत्तांत.**

श्री. ओमप्रकाश यादव (मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळ)यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ३९ वी विशेष बैठक दिनांक १५.०४.२०१७ रोजी सकाळी ११.०० वा. कामगार भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ. |
| २. | श्री. यशवंत केरुरे | मा. कामगार आयुक्त (शासकीय प्रतिनिधी) |
| ३. | श्रीमती गीता पिंपळे | उपसचिव (शासकीय प्रतिनिधी यांचे प्रतिनिधी) |
| ४. | श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ६. | श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळाच्या माजी सचिव श्रीमती निलांबरी भोसले यांनी मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. त्याचबरोबर मंडळावर नुकतेच प्रतिनियुक्तीने नियुक्त झालेले सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. श्री. चु. श्रीरंगम यांची ओळख करून दिली व मंडळावर पुर्णवेळ स्वतंत्र सचिव नियुक्त झाल्याचे सरव उपस्थित सदस्यांच्या निर्दशनास आणून दिले. सर्व उपस्थितांनी त्यांचे स्वागत केले. त्याचबरोबर सदस्यांनी मंडळाचे नवनियुक्त सचिव यांना

आपली ओळख करुन दिली. मंडळाच्या माजी सचिव यांनी दिनांक २८.०२.२०१७ रोजीच्या मंडळ बैठकीत ठरल्याप्रमाणे RFP Document बनविण्यासाठी शासनाकडुन नेमण्यात आलेल्या पाच IT Consultants पैकी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात आल्याचे सर्व उपस्थितांना सांगितले व KPMG चे प्रतिनिधी श्री. अमित जोशी श्री. पाटील, व श्री. लक्ष्मण गाडेड यांची ओळख करून दिली. त्यानंतर बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच सर्व उपस्थितांना वाटप करण्यात आले व श्री.श्री. चु. श्रीरंगम, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बैठकीच्या पुढील कामकाजात सहभाग घेतला.

तद्नंतर विषयसुचीनुसार पुढील चर्चा करण्यात आली.

# बैठकीची विषयसूची

| अ.क्र. | विषय | घेण्यात आलेला निर्णय |
|---|---|---|
| १. | **मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.** | मंडळाचे सचिव यांनी दिनांक २८.०२.२०१७ रोजीचे इतिवृत्तांत वाचून दाखविले त्याचबरोबर सदर बैठकीच्या ठरावावर काय कार्यवाही करण्यात आली हे ही सांगितले. सदर कार्यवाहीचा सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे:<br>**विषय क्र.२: मंडळाचे एकात्मिक कामकाज संगणकीय प्रणालीनुसार बाहययंत्रणेद्वारे करण्यासाठी तयार केलेल्या RFP Document बाबत.**<br>**ठराव:** मंडळांतर्गत कामकाजाचे एकात्मिक संगणकीय प्रणाली बाह्ययंत्रणेमार्फत तयार करुन घेणेबाबत तयार करण्यात आलेले RFP Document व ई-निविदा रद्द करण्यात यावी. मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट ॲन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी. त्याऐवजी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेकडून सदर कामाचे नव्याने RFP Document तयार करून घेण्यात यावे. नव्याने तयार करण्यात आलेल्या RFP Document मंडळाचे बैठकीसमोर ठेवून त्यावर चर्चा करून त्यास मंडळाची मान्यता घेवून पुन्हा मंडळ स्तरावर |

ई-निविदा प्रसिद्ध करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** मंडळामार्फत नियुक्त करण्यात आलेले IT Consultant मे. अर्न्स्ट अँन्ड यंग एल पी पी यांची नियुक्ती दिनांक २३.०३.२०१७ रोजी रद्द करण्यात आली व त्याएवजी दिनांक २८.०२.२०१७ रोजीच्या मंडळ बैठकीतील ठरावानुसार शासनाकडून नेमण्यात आलेल्या पाच IT Consultant पैकी KPMG या IT Consultant ची नियुक्ती दिनांक २३.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आली आहे.

**विषय क्र.३: नोंदित बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेबाबत.**

**ठराव :** नोंदित बांधकाम कामगारांच्या कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेबाबत ट्रेनिंग प्रोव्हायडर्स (Training Providers) यांचेशी करारनामा करुन त्यांना कार्यारंभ आदेश देण्यात यावेत तसेच नियुक्ती करण्यात आलेल्या एजन्सीला कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेअंतर्गत जास्तीत जास्त लक्षांक देण्यात येऊन लक्षांक पुर्ती करून घेण्यात यावी. तसेच Assesment चे सुध्दा कामकाज संबंधित संस्थेकडून करून घेण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** कौशल्यवृध्दी (RPL Scheme) योजनेबाबत दिनांक १६.०३.२०१७ रोजी

शासनास प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. मंडळाच्या ठरावानुसार ट्रेनिंग प्रोव्हाइड करणाऱ्या पाच संस्थांसोबत दिनांक १६.०३.२०१७ रोजी MOU करण्यात आले आहेत व याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे. शासन स्तरावरून सदर MOU ची माहिती DGET व RDAT या संस्थांना पाठविणेबाबत विनंती करण्यात आली आहे.

**विषय क्र.४: योजनांची अंमलबजावणी करणेसाठी बाह्य यंत्रणेची/ सल्लागार कंपनीची (Consultant) नियुक्ती करणेबाबत.**

**ठराव:** योजनांची अंमलबजावणी करणेसाठी वरील विषय क्र. २ मध्ये झालेल्या चर्चेनुसार शासनाकडुन नेमण्यात आलेल्या पाच IT Consultant पैकी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** दिनांक २८.०२.२०१७ रोजीच्या मंडळ बैठकीत ठरल्याप्रमाणे दिनांक २३.०३.२०१७ रोजी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात आली आहे.

**विषय क्र.५: मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांसाठी जनजागृती मोहीम राबविणेबाबत.**

**ठराव:** मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांचा दिनांक २५ एप्रिल २०१७ ते १ मे २०१७ या कालावधीत "जनजागृती सप्ताह" आयोजित करण्यात यावा.

Desk-३०/SKB/C.१

| | |
|---|---|
| | त्यामध्ये मुख्यालय स्तरावर एक मोठा Event आयोजित करण्यात यावा. तसेच प्रत्येक जिल्हा कार्यालयस्तरावर एक कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. सदर Event व राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनेची विविध प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात यावी. तसेच रेडिओ जिंगल्स, एस.टी. बसेस, BEST बसेस व एस.टी स्टॅंड वर होर्डीग्ज लावणे, फिरत्या वाहनांद्वारे मंडळाच्या योजनांची जनजागृती करणे. तसेच बांधकामाच्या ठिकाणी व कामगारांच्या नाक्यावर मंडळाच्या योजनांचे मोठे फलेक्स लावणे, मंडळाच्या योजनांबाबतचे पुस्तक वाटप करणे. इत्यादीमार्फत मंडळाच्या योजनांची जनजागृती करण्यात यावी. सदर Event मध्ये बांधकामाशी संबंधित शासकिय प्राधीकरणांचा सहभाग घेण्यात यावा. कार्यक्रमाचे Event Management करण्यासाठी वृक्ष लागवड मोहिमेचे Event Management केलेले आहे. त्या धर्तीवर काम देण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.<br><br>**कार्यवाही:** मंडळामार्फत राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांचा दिनांक २५ एप्रिल २०१७ ते १ मे २०१७ या कालावधीत **"जनजागृती सप्ताह"** आयोजित करण्यासाठी Event Manager ची निवड करणे आवश्यक आहे. मंडळाच्या ठरावानुसार |

वृक्षलागवड मोहिमेचे Event Management केलेल्या संस्थेची माहिती वनविभागाकडून प्राप्त केली असता महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाच्या पॅनलवर नियुक्त १० संस्थांपैकी एका संस्थेची निवड वृक्षलागवड मोहिमेच्या Event करीता करण्यात आल्याचे समजले. MTDC कडून याबाबत माहिती प्राप्त केली असता सन २०१६ मध्ये ई-निविदा पद्धतीमध्ये जाहिर निविदा मागवुन प्राप्त १३ निविदांपैकी १० पात्र निविदाकारांची नेमणूक मंडळाच्या पॅनलवर करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली. याशिवाय प्राप्त माहितीनुसार खालील विभागाने महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाने नियुक्त संयोजक अभिकर्त्यांकडून(Event Manager) यापुर्वी कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे.

| अं.क्र. | विभागाचे नाव | कार्यक्रमाचे नाव | योजनेचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | वन विभाग | व्याघ्र दिन | २९ जुलै २०१६ |
| २. | विक्रीकर विभाग | विक्रीकर दिन | १ ऑक्टोबर २०१६ |
| ३. | महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ व सांस्कृतिक विभाग | Quit India Movement | ९ ऑगस्ट २०१६ |

त्याधर्तीवर मंडळाने नियूक्त केलेल्या मे. KPMG च्या सल्लागारांना (Consultant) EOI चे प्रारुप तयार करण्याबाबत दिनांक १०.०४.२०१४ रोजी कळविण्यात आले. सदर

EOI दिनांक १२.०४.२०१७ रोजी MTDC च्या पॅनलवरील १० संस्थांना पाठविण्यात आले व दिनांक १५.०४.२०१७ रोजीच्या मंडळाच्या विशेष बैठकीत सादरीकरण करणेबाबत संबंधित संस्थांना सुचित करण्यात आले. त्यानुसार आजच्या विशेष बैठकीत उपस्थित संस्थांकडून सादरीकरण करण्यात येणार आहे.

**विषय क्र.६: मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अवजारे/हत्यारे खरेदी करण्याकरीता प्रती कुटूंब रू.५०००/- अर्थसहाय्य योजनेबाबत.**

**ठराव:** मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अवजारे/हत्यारे खरेदी करण्याकरीता प्रती कुटूंब रू.५०००/- अर्थसहाय्य योजनेची शासनमान्यतेनुसार तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. त्यासाठी जिल्हा कार्यालयांमार्फत निधीचे प्रस्ताव मागविण्यात यावे व कामगारांना लाभाचे वाटप करण्यास तात्काळ सुरुवात करावी व सदर योजनेची प्रेस नोट तयार करून त्याची विविध वृत्तपत्रातून प्रसिद्धी करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना अवजारे/हत्यारे खरेदी करण्याकरीता प्रती कुटूंब रू.५०००/- अर्थसहाय्य योजनेस दिनांक ०१.०३.२०१७ रोजी शासनमान्यता प्राप्त झाली असून मुख्यालयाच्या दिनांक २९.०४.२०१६ च्या पत्रान्वये

सदर योजनेबाबतची कार्यप्रणाली व अर्जाचा नमुना सर्व क्षेत्रीय कार्यालयांना पाठविण्यात आला आहे. सदर योजनेची माहिती सर्व लाभार्थ्यांना मिळावी या हेतूने एक प्रेस नोट दिनांक ०२.०३.२०१७ रोजी माहिती संचालनालयाला पाठविण्यात आली व सदर नोट पुढारी व लोकमत या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली. राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयांमार्फत निधीच्या मागणीचे प्रस्ताव दिनांक ०२.०३.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आले. दिनांक १५.०४.२०१७ पर्यंत १६ जिल्हयांनी निधी मागणीचे प्रस्ताव मुख्यालयास सादर केलेले आहेत. ज्या जिल्हयांनी अद्याप निधी मागणीचा प्रस्ताव सादर केलेला नाही त्यांना दिनांक १३.०४.२०१७ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आलेले आहे.

**विषय क्र.७: उपकर जमा करण्यासाठी प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणाचे Mapping करणेबाबत.**

**ठराव:** राज्यातील बांधकामाच्या ठिकाणांचे GPS System द्वारे Mapping करण्यासाठी प्रथम KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचेमार्फत बांधकामाच्या ठिकाणाचे GPS System द्वारे Mapping करणाऱ्या कंपनीची नियुक्ती करण्यासाठी ई-निविदा प्रसिद्ध करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** राज्यातील बांधकामाच्या ठिकाणांचे GPS System द्वारे Mapping

करण्यासाठी दिनांक २८.०२.२०१७ रोजीच्या मंडळ बैठकीतील ठरावाप्रमाणे दिनांक २३.०३.२०१७ रोजी शासनमान्य KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात आलेली आहे. KPMG या संस्थेस GPS System द्वारे Mapping करणाऱ्या संस्थांची निवड करण्यासाठी मागवावयाच्या ई-निविदेचे RFP सादर करणेबाबत कळविण्यात येत आहे.

**विषय क्र.८: बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत.**

**ठराव:** बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत मंडळामार्फत शासनमान्य KPMG यांची आय.टी. कंसल्टंटची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था (NGO) व या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या इतर संस्था यांना नियुक्त करण्यात यावे. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी पाळणाघराची सुविधा उपलब्ध करून देणेबाबत मंडळामार्फत दिनांक २८.०२.२०१७ रोजीच्या मंडळ बैठकीतील ठरावाप्रमाणे दिनांक २३.०३.२०१७ रोजी KPMG या IT Consultant ची

| | | |
|---|---|---|
| | | नियुक्ती करण्यात आली आहे. सदर क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था (NGO) व या क्षेत्रात काम करणाऱ्या इतर संस्था यांची नियुक्ती करण्यासाठी मागवावयाच्या ई-निविदेचे RFP तयार करणेबाबत KPMG या संस्थेस कळविण्यात येत आहे.<br>**विषय क्र.९: बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी शाळा बांधणेबाबत.**<br>**ठराव:** बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी प्लेस्कुल सुविधा उपलब्ध करून देणेबाबत मंडळामार्फत शासनमान्य आय.टी कंसल्टंटची KPMG यांची नियुक्ती करावी व सदर Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था (NGO) यांना नियुक्त करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता. त्याचप्रमाणे सदर बैठकीतील विषय क्र. ८ बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी पाळणाघराची सुविधा उपलब्ध करणे व विषय क्र.९ बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी शाळा चालविणे संबंधित विषय असुन दोन्ही विषय एकत्रित करुन **"बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी Play-School सुविधा उपलब्ध करून देणे"** असा विषय घेण्यात यावा, अशीही सुधारणा मा. अध्यक्ष यांनी सुचविली. |

Desk-३०/SKB/C.९

**कार्यवाही:** बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बांधकामाच्या ठिकाणी फ्लेस्कुल सुविधा उपलब्ध करून देणेसाठी मंडळामार्फत दिनांक २८.०२.२०१७ रोजीच्या मंडळ बैठकीतील ठरावाप्रमाणे दिनांक २३.०३.२०१७ रोजी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात आली आहे व त्यांना इ-निविदेचे RFP तयार करण्याबाबत कळविण्यात येत आहे.

**विषय क्र.१०: नोंदित बांधकाम कामगारांना Primary Health Kit पुरविणेबाबत.**

**ठराव:** नोंदित बांधकाम कामगारांना Primary Health Kit बाबतचा प्रस्ताव सध्या स्थगित ठेवण्यात यावा. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** सदर विषय स्थगित ठेवण्यात आलेला आहे.

**विषय क्र.११: बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजना राबविणेबाबत.**

**ठराव:** बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजनेसाठी प्रथम शासनमान्य आय.टी कंसल्टंट KPMG यांची नियुक्ती करावी व Consultant मार्फत ई-निविदा प्रसिध्द करुन सदर क्षेत्रात काम करणाऱ्या बचत गटांना/संस्थांना नियुक्त करण्यात यावे. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन योजनेसाठी दिनांक २८.०२.२०१७

रोजीच्या मंडळ बैठकीतील ठरावाप्रमाणे दिनांक २३.०३.२०१७ रोजी KPMG या IT Consultant ची नियुक्ती करण्यात आली आहे व त्यांना सदर योजना राबविण्यासाठी बचत गट/संस्था नियुक्त करण्यासाठी मागवावयाच्या ई-निविदेचे RFP सादर करणेबाबत कळविण्यात येत आहे.

**विषय क्र.१२: केंद्र शासनाने अधिनियमाच्या कलम ६० अन्वये दिलेल्या निदेशाबाबत ठराव घेणे. मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी अटल पेन्शन योजना लागू करणे.**

**ठराव:** मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत रु.१०००/- प्रति लाभार्थी इतकी पेन्शन १००% प्रतिपुर्ती पध्दतीने लागू करणे व सदर योजनेसाठीचा प्रस्ताव शासनास पाठविणे व शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर सदर योजना बांधकाम कामगारांना लागू करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी अटल पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासनास पाठवावयाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. लवकरच शासनास पाठविण्यात येईल.

**विषय क्र.१३: मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडे तत्वावर घरे पुरविण्याच्या योजनेबाबत.**

**ठराव:** मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडे तत्वावर घरे पुरविण्याच्या योजना राबविण्यासाठी शासनाने पत्राव्दारे सुचीत केलेल्या मुद्यावर सर्वसमावेशक आराखडा मालक प्रतिनिधी श्री. मगर यांच्याकडून प्राप्त करुन घेणेबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** सदर योजनेबाबत मालक प्रतिनिधी श्री. मगर यांच्याकडून सर्वसमावेशक आराखडा मागविण्यात आलेला आहे. परंतु अद्याप आराखडा श्री. मगर यांच्याकडून अप्राप्त आाहे.

**विषय क्र.१४: मंडळाचे आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत.**

**ठराव:** मंडळाचे आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. सदर मान्य अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात यावे असेही सर्वानुमते ठरले होते.

**कार्यवाही:** मंडळाचे आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकास मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर मान्य अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात येत आहे.

**विषय क्र.१५: कामगार नोंदणीच्या नुतणीकरणाचा कालावधी वाढविण्याबाबत.**

**ठराव:** कामगार नोंदणीचा व नुतणीकरणाचा कालावधी वाढविण्याबाबत व नुतनीकरणाचे अधिकार जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना प्रदान करण्याबाबत केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मार्गाविण्यात यावे व त्यानुसार राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** कामगार नोंदणीचा व नुतणीकरणाचा कालावधी वाढविण्याबाबत व नुतनीकरणाचे अधिकार जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना प्रदान करण्याबाबत केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मार्गाविण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २०मार्च २०१७ रोजी केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे.

**विषय क्र.१६: आयत्या वेळचे विषय.**

**विषय क्र.१६.१: मा. कामगार आयुक्त यांना रु. १ लाख मर्यादेपर्यंतच्या बिलाचे अधिकार देणे.**

मा मा. अध्यक्ष यांनी सदर प्रस्तावास असहमती दर्शविली. त्यामुळे कार्यवाही निरंक.

**विषय क्र.१६.२:मा. अध्यक्ष यांच्या मुंबई येथील वास्तव्यादरम्यानच्या तसेच वाहनावरील अतिरिक्त खर्चास मान्यता देणे.**

**ठराव:** मा. अध्यक्षांच्या ०१.०४.२०१६ ते २८.०२.२०१७ या कालावधीच्या भाड्याच्या

वाहनासाठी १५६६७ कि.मी. साठी ४,३५,६८७/- एवढया झालेल्या अतिरीक्त खर्चास मंडळाची मंजूरी देण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

**कार्यवाही:** मा. अध्यक्षांच्या मुंबई येथील वास्तव्यादरम्यानच्या तसेच वाहनावरील अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आलेली आलेली आहे.मंडळाच्या ठरावानुसार सदर रक्कम मे. साई गणेश प्रा. लि. यांना अदा करण्यात आलेली आहे.

**विषय क्र.१६.३:मंडळाच्या दिनांक ०४.०१.२०१७ रोजीच्या गुंतवणूक बैठकीबाबत.**

मंडळाचे उपस्थित सदस्य श्री. अशोक गोंविदराव भुताड कामगार प्रतिनिधी यांनी मंडळाच्या होणाऱ्या प्रत्येक बैठकीमध्ये मंडळाच्या गुंवणुकीबाबतची माहिती सादर करण्यात यावी असे सुचविले त्यास मंडळाच्या सचिवांनी सहमती दर्शविली आहे.

**कार्यवाही:** दरम्यान कोणतीही गुंतवणूक करण्यात आलेली नसल्याने माहिती ठेवण्यात आलेली नाही.

**विषय क्र.१६.४:परभणी कार्यालयास जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६पर्यंतच्या भाडे अदा करण्यास मंजूरी देणेबाबत.**

**ठराव:** परभणी कार्यालयास जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६ पर्यंतचे भाडे अदा

करण्यास मंजूरी देण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** परभणी कार्यालयास जानेवारी २०१६ ते डिसेंबर २०१६ पर्यंतचे भाडे अदा करण्याबाबत मंडळाच्या ठरावानुसार दिनांक १६.०३.२०१७ रोजी कळविण्यात आलेले आहे.

**विषय क्र.१६.५:महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची माहिती पुस्तिका छापून घेण्याबाबत.**

**ठराव:** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती पुस्तिका मे. प्रिंट प्लस प्रा. लि. मुंबई यांजकडून छपाई करून घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली होती.

**कार्यवाही:** मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती पुस्तिका मे. प्रिंट प्लस प्रा. लि. मुंबई यांजकडून १लाख प्रति छपाई करून घेण्यात आल्या आहेत. सदर प्रति प्रत्येक जिल्हयास पाठविण्यात आलेल्या आहेत.

मा. अध्यक्ष यांनी सुचित केल्यानुसार सर्व जिल्हयांना माहितीपुस्तक प्राप्त झाल्याची खात्री करुन घेण्यात येईल व पुस्तिका वाटपासंदर्भात पुन्हा एकदा सुचना देण्यात येतील.

**विषय क्र.१६.६:मंडळांतर्गत शासनामार्फत मान्यताप्राप्त पुर्णवेळ पदांची भरती करणेबाबत.**

**ठराव:**मंडळांतर्गत शासनामार्फत मान्यताप्राप्त ५६ पुर्णवेळ पदांची भरती तात्काळ करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला होता.

**कार्यवाही:** मंडळांतर्गत शासनामार्फत मान्यताप्राप्त ५६ पुर्णवेळ पदांची भरती तात्काळ करण्यासाठी सेवाप्रवेश नियम मंजूरीबाबतचा प्रस्ताव दिनांक २०.०४.२०१६ व १२.०४.२०१७ रोजी शासनास पाठविण्यात आलेला आहे. अद्याप मंजूरी अप्राप्त आहे.

**विषय क्र.१६.७:मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांसाठी भाडेतत्वावर घरकूल योजना समितीवर आर्किटेक्टची (Architect) नियुक्ती करणेबाबत**

**ठराव:** मे. शेटये आर्किटेक्ट यांनी सर्वात कमी दराची (रु. १०,०००/- प्रति महिना मानधन) निवीदा सादर केलेली आहे. त्यांची सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी समितीवर आर्किटेक्टची (Architect) म्हणून नियुक्ती करणेबाबतचा ठराव सर्वानुमत संमत करण्यात आलेला आहे.

**कार्यवाही:** सदर विषयाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**विषय क्र.१६.८: कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविणाऱ्या मे. ब्रिस्क फॅसिलिटीज प्रा. लि.यांचे कंत्राटास १ वर्षाची मुदतवाढ देण्याबाबत.**

याबाबत मा. मंत्री महोदय यांनी सदर कंपनीस मुदतवाढ देण्याविषयी लवकरच शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल, असे नमूद केले.

**कार्यवाही:** मे. ब्रिस्क फॅसिलिटीज प्रा. लि. या मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराची मुदत ३ वर्षासाठी वैध आहे. शासन निर्देशानुसार दिनांक ०४.०८.२०१४ रोजी करण्यात आलेल्या कराराची मुदत दिनांक ०३.०८.२०१७ रोजी संपृष्टात येत आहे. सदर, कामगार आयुक्त कार्यालयाच्या अंतर्गत विविध कार्यालये तसेच, नियंत्रणाखाली विविध मंडळे व अन्य क्षेत्रीय कार्यालयांमध्ये गट-क व गट-ड या स्तरावरील मनुष्यबळ पुरविणाऱ्या एजन्सीचे पॅनेल तयार करण्यासाठी पुन्हा ई-निविदा प्रक्रीया राबवावी किंवा कसे. तसेच सध्याच्या दिनांक १६.०६.२०१४ च्या शासन निर्णयान्वये कंत्राटदारास मुदत वाढ द्यावी किंवा कसे, याबाबत शासन स्तरावरून उचित आदेश प्राप्त करण्यासाठी कामगार आयुक्त, मुंबई यांच्या दिनांक ०३.०४.२०१७ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**विषय क्र.१६.९: मंडळाच्या लेख्यांचे लेखांकन (Data Entry) माहे एप्रिल २०१७ पासून Tally Solution या लेख्याच्या संगणकीय पदध्तीने सुरू करणे.**

**ठराव:** मंडळाच्या लेख्यांचे लेखांकन (Data Entry) माहे एप्रिल २०१७ पासून Tally Solution या लेख्याच्या संगणकीय पदध्तीने सुरू करण्यासाठी तज्ञ कंपनीकडून दर पत्रके मागवून कमी दर असलेल्या कंपनीकडून सदर संगणकीय पध्दती विकसित करून घेण्यात यावी असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

**कार्यवाही:** मंडळाच्या लेख्यांचे लेखांकन (Data Entry) माहे एप्रिल २०१७ पासून Tally Solution या लेख्याच्या संगणकीय पदध्तीने सुरू करण्याबाबत ३ कंपन्याचे दरपत्रक मागविण्यात आलेल्या आहे.पुढील कार्यवाही चालु आहे.

**विषय क्र.१६.१०: मंडळाचे कार्यालय अंधेरी येथे स्थलांतरीत करणे.**

**ठराव:** मंडळाचे स्वतंत्र कार्यालय कामगार कल्याण मंडळ, अंधेरी येथील इमारतीत अधिवेशनानंतर स्थलांतरीत करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

**कार्यवाही:** कामगार कल्याण मंडळाची इमारत बांधुन तयार आहे. तथापि, बृहन्मुंबई

| | | |
|---|---|---|
| | | महानगर पालिकेकडून **Occupancy Certificate** अद्याप अप्राप्त आहे. सबब, मंडळाचे मा. अध्यक्ष यांच्याशी चर्चा करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.<br>**विषय क्र. १६.११: मंडळाचे मा. अध्यक्ष यांच्या वाहन खरेदीबाबत.**<br>मा. अध्यक्ष यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा प्राप्त झाल्यानुसार २० लाखाच्या मर्यादेपर्यंत शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. त्यांचा इनोव्हा क्रिस्टा कंपनीचे वाहन खरेदी करण्याचा मानस आहे. यावर मा. मंत्री महोदय यांनी अध्यक्ष यांना अपेक्षित असलेले वाहन खरेदी करण्यास शासन म्हणून मान्यता देण्यात आली आहे.<br>**कार्यवाही:** मा. अध्यक्ष यांचे वाहन खरेदी करण्याबाबतची प्रक्रीया पुणर् करण्यात आलेली असून सदर कंपनीला धनाकर्ष देण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर कंपनीकडून किमान १५ ते २० दिवसात वाहन प्राप्त होणे अपेक्षित आहे.<br>मंडळाच्या दिनांक २८.०२.२०१७ रोजीच्या बैठकीच्या ईतिवृत्तांतास सर्व उपस्थितांनी मान्यता दिली. |
| २. | **मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांसाठी जनजागृती मोहीम** | याबाबत बोलताना मंडळ सचिव यांनी असे स्पष्ट केले की. दि. २८.०२.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत वृक्षलागवड मोहिमेप्रमाणे (Tree-plantation) मंडळाच्या |

| | | |
|---|---|---|
| | **राबविणेबाबत.** | कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यासाठी दिनांक २५ एप्रिल ते १ मे या कालावधीत "जनजागृती सप्ताह" आयोजित करण्यात यावा. त्यामध्ये मुख्यालय स्तरावर एक मोठा Event आयोजित करण्यात यावा. तसेच प्रत्येक जिल्हा कार्यालय स्तरावर एक कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. सदर Event ची विविध प्रसार माध्यमांद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच रेडिओ जिंगल्स, एस.टी. बसेस व एस.टी स्टँड वर होर्डींग्ज लावणे, फिरत्या वाहनांद्वारे मंडळाच्या योजनांची जनजागृती करणे, तसेच बांधकामाच्या ठिकाणी व कामगारांच्या नाक्यावर मंडळाच्या योजनांचे मोठे फलेक्स लावणे, मंडळाच्या योजनांबाबतचे पुस्तक वाटप करणे, इत्यादीमार्फत मंडळाच्या योजनांची जनजागृती करण्यात यावी, असा ठराव मंजूर करण्यात आला होता.<br>त्यानुसार वृक्षलागवड (Tree-plantation) मोहिमेचे Event Management केलेल्या संस्थेची माहिती वन विभाग, महाराष्ट्र, शासन यांचेकडून प्राप्त केली असता महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाने त्यांच्या पॅनलवर नेमणूक केलेल्या Event Managers कडून सदर Event चे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती प्राप्त झाली आहे. त्यानुसार महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाच्या कार्यालयाकडून अधिकची माहिती प्राप्त |

केली असता महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाकडे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये संयोजक अभिकर्ता (Event Manager) नियुक्तीसाठी वर्तमान पत्रातून जाहिरात देवून निविदा मागविल्या होत्या. महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाकडे प्राप्त १३ निविदांची छाननी करून त्यापैकी पुढील १० संस्थांची संयोजक अभिकर्ता (Event Managers) म्हणून नियुक्ती करण्यात आली.

| Sr. No. | Agency Name |
|---|---|
| १. | We- The Working Elements |
| २. | DDB Mudra Pvt. Ltd. |
| ३. | Lokmat Media Pvt. Ltd. |
| ४. | Leo-Burnett. |
| ५. | Goldmine Advertising Pvt. Ltd. |
| ६. | Zapak Digital Entertainment Pvt. Ltd. |
| ७. | Percept D' Mark |
| ८. | ADM Mark Events India Pvt. Ltd. |
| ९. | VISAN Graphics |
| १०. | Alica Purple Advertising Pvt. Ltd. |

Desk-३०/SKB/C.९

महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाकडुन आयोजित करावयाचे कार्यक्रम उक्त एम्पॅनल केलेल्या संस्थांमार्फत करण्यात येतात. याशिवाय प्राप्त माहितीनुसार खालील विभागांनी महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाने एम्पॅनल केलेल्या संयोजक अभिकर्त्यांकडून (Event Manager) यापुर्वी कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | कार्यक्रमाचे नाव | योजनेचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | वन विभाग | व्याघ्र दिन | २९ जुलै २०१६ |
| २. | विक्रीकर विभाग | विक्रीकर दिन | १ ऑक्टोबर २०१६ |
| ३. | महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ व सांस्कृतिक विभाग | Quit India Movement | ९ ऑगस्ट २०१६ |

उपरोक्त विभागाने सदर कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाने एम्पॅनल केलेल्या १० संस्थांकडून EOI (Expression of Investment) मागवून त्यापैकी एका संस्थेची निवड कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता केली होती.

मंडळाने पारित केलेल्या उपरोक्त ठरावानुसार व इतर विभागाने अनुसरलेल्या उपरोक्त पद्धतीनुसार दिनांक **२५ एप्रिल ते १ मे** या कालावधीत **"जनजागृती सप्ताह"** आयोजित करण्याकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाच्या

| | | |
|---|---|---|
| | | पॅनलवरील १० संस्थांकडून "जनजागृती सप्ताह" आयोजनाकरिता एका संस्थेची निवड करण्यासाठी सदर संस्थांकडून EOI मागविणे आवश्यक असल्याने EOI चे प्रस्ताव सादर करणेबाबत मंडळाचे सल्लागार (Consultant) मे. KPMG यांना कळविण्यात आले. मे. KPMG कडून प्राप्त प्रारुप MTDC च्या पॅनलवरील १० संस्थांना दिनांक १२.०४.२०१७ रोजी E-Mail द्वारे कळविण्यात आले व दिनांक १५.०४.२०१७ रोजी EOI सादरीकरण करणेबाबत सुचना देण्यात आली. त्याअनुषंगाने १० संस्थांपैकी खालील चार संस्थांनी सादरीकरणासाठी सहभाग घेतलेला आहे. |

| **Sr. No.** | **Agency Name** |
|---|---|
| १. | Goldmine Advertising Pvt. Ltd. (गोल्डमाईन ॲडव्हर्टायजींग प्रा.लि.) |
| २. | Percept D. Mark (परसेप्ट डि-मार्क) |
| ३. | Zapak Digital Entertainment Pvt. Ltd. (झपाक डिझीटल इंटरटेनमेंट प्रा.लि.) |
| ४. | Working Elements (वर्किंग इलेमेंट) |